महाराष्ट्र शासन

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

सत्यमेव जयते

# १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम आढावा

## अंतिम मूल्यमापन कार्यपद्धती

# १.संकेतस्थळ

| अ.क्र. | केलेली कार्यवाही |
|---|---|
| अ) | संकेतस्थळ वापरण्यास सुलभ करण्यात आले आहे. |
| आ) | संकेतस्थळावर माहितीचे अद्ययावतीकरण करण्यात आले आहे. |
| इ) | JJM अंतर्गत 51,560 योजनांच्या विविध उपांगाच्या सर्व कामाचा तपशील IMIS या प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात आला आहे. |
| ई) | सुरक्षा(Data/Cyber security) लेखापरिक्षण करण्यात आले आहे. |
| उ) | सध्या विभागाच्या 16 सेवा ऑनलाईन करण्यात आलेल्या आहेत व 2 सेवा ऑफलाईन आहेत. |

# सेवा व सेवा मिळण्याचा कालावधी

| अ.क्र. | सेवा | सेवा मिळण्याचा कालावधी (दिवस) |
|---|---|---|
| महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिसूचित | | |
| १ | नविन नळ जोडणी | 15 |
| २ | मालकी  हक्कात बदल करणे | 07 |
| ३ | नळ जोडणी आकारामध्ये बदल करणे | 15 |
| ४ | तात्पुरते/ कायमस्वरूपी नळ जोडणी खंडीत करणे | 07 |
| ५ | पुन: जोडणी करणे | 15 |
| ६ | वापरामध्ये बदल करणे | 15 |
| ७ | पाणी देयक तयार करणे | 03 |
| ८ | प्लंबर परवाना | 15 |
| ९ | प्लंबर परवाना नुतनीकरण करणे | 15 |
| १० | थकबाकी नसल्याचा दाखला | 03 |
| ११ | नादुरूस्त मिटर तक्रार करणे | 07 |
| १२ | अनधिकृत नळजोडणी तक्रार | 07 |
| १३ | पाण्याची दबाव क्षमता तक्रार | 03 |
| १४ | पाण्याची गुणवत्ता तक्रार | 03 |
| १५ | पाणी बिलासंबंधी  तक्रारीचे निवारण करणे | 30 |
| १६ | नळ जोडणी स्थलांतरीत करणे | 30 |
| भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणाच्या अधिसूचित | | |
| १७ | विंधन विहीर/विहीर स्थळ सर्वेक्षण (भूजलीय आणि भूभौतिक) | 30 |
| १८ | पाणी नमुन्यांचे रासायनिक व जैविक पृथ:करण | 30 |

# २. केंद्र शासनाशी सुसंवाद (१/४)

## अ) राज्याच्या विकासाशी संबंधित केंद्र शासनाकडे प्रलंबित प्रस्ताव व विधेयकांचा पाठपुरावा करुन पुर्तता करणे.

- JJM अंतर्गत 59 पाणी पुरवठा योजनांचा समावेश करुन घेण्याबाबत पाठपुरावा.

- मराठवाडा वॉटरग्रीड करिता केंद्र शासनाकडून आंतरराष्ट्रीय वित्तिय संस्थेकडून कर्ज प्राप्त करून घेण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार दि.०७/०२/२०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे स्तरावरुन आंतरराष्ट्रीय वित्तिय संस्थेच्या प्रतिनिधी बरोबर बैठक आयोजित करण्यात आली होती.

# २. केंद्र शासनाशी सुसंवाद (२/४)

## आ) राज्यासाठी केंद्रीय योजनांचा दिलेला लक्षांक पूर्ण करणे

| अ.क्र. | तपशील | लक्ष्य | साध्य | साध्याची (%) | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंगणवाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी नळजोडणी उपलब्ध करून देणे. (अंगणवाडी) | 90,656 | 90,656 | 100 | 0 |
| २ | स्त्रोतांचे जिओटॅगिंग साध्य करणे.(स्त्रोत संख्या) | 57,890 | 57,890 | 100 | 0 |
| ३ | योजना माहिती फलकाचे जिओटॅगिंग साध्य करणे. (फलक संख्या) | 58,226 | 58,226 | 100 | 0 |
| ४ | शाळांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी नळजोडणी उपलब्ध करून देणे. (शाळा) | 81,512 | 81,512 | 100 | 0 |
| ५ | पीएम-जनमन योजनेअंतर्गत PVTG गावांचे नळ जोडणी साध्य करणे (गावे) | 133 | 133 | 100 | 0 |
| ६ | सांडपाणी व्यवस्थापन (गावे) | 40,247 | 37,844 | 94 | 2,403 |
| ७ | वैयक्तिक शौचालय बांधकाम (संख्या) | 7,74,609 | 7,08,864 | 91 | 67,583 |
| ८ | गोबरधन प्रगती (संख्या) | 36 | 33 | 92 | 03 |
| ९ | हर घर जल अंतर्गत नळ जोडणीचे लक्ष्य (घर संख्या) | 1,46,78,590 | 1,31,68,547 | 89.71 | 15,00,043 |
| १० | घनकचरा व्यवस्थापन (गावे) | 40,247 | 33,235 | 83 | 7,012 |
| ११ | हगणदारी मुक्त अधिक मॉडेल गावे प्रगति | 40,247 | 32,099 | 80 | 8,148 |

दि. ३०/०४/२०२५ आखेर

# २. केंद्र शासनाशी सुसंवाद (३/४)

## इ ) केंद्रीय योजनांसाठी केंद्राचा हिस्सा प्राप्त करुन घेणे, तसेच राज्याचा निधी अर्थसंकल्पीत करुन वितरीत करुन घेणे

JJM अंतर्गत केंद्रीय हिस्सा प्राप्त करुन घेण्यासाठी मा.प्रधान सचिव ,मा.मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ,मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे स्तरावरुन जलशक्ती मंत्रालय यांचेशी पाठपुरावा करण्यात आले आहे.

**रु. कोटीत**

| अ. क्र. | प्रकल्प | केंद्र हिस्सा तरतूद | राज्य हिस्सा तरतूद | केंद्र हिस्सा प्राप्त | राज्य हिस्सा प्राप्त | एकूण प्राप्त | वितरीत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जल जीवन मिशन (२०२४-२०२५) | 19,129.81 | 18,609.85 | 1,605.88 | 1568.40 | 3174.27 | 3174.27 |
| २. | सन २०२४-२५ मध्ये विशेष बाब (जल जीवन मिशन )* | - | - | - | 2483.58 | 2483.58 | 2483.58 |
| ३. | सन २०२४-२५ स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा २ | 1596.01 | 763.76 | 231.62 | 154.42 | 386.04 | 386.04 |

*धोरणात्मक निर्णयानुसार केद्र सरकार कडून २०२४-२५ करीता पुर्ण निधी वितरीत करण्यात आला नाही त्यामुळे विषेश बाब म्हणून राज्य सरकार कडून निधी उपलब्ध करून घेण्यात आला.

# २. केंद्र शासनाशी सुसंवाद (४/४)

## ई ) केंद्र शासनाच्या  विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या पत्रांवर वेळीच कार्यवाही करुन अनुपालन सादर करणे

केंद्र सरकार कडून 119 पत्र प्राप्त झाली व 112 पत्रावर कार्यवाही करून अनुपालन अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

दि. १७/०४/२०२५ आखेर

# ३.स्वच्छता

| अ.क्र. | केलेली कार्यवाही |
| --- | --- |
| अ) | विभागातील  एकूण 11,242 संचिकांचे निंदणीकरण करुन अ वर्ग – 456,ब वर्ग – 811,क वर्ग – 6052 ,ड वर्ग – 3923 असे वर्गीकरण करण्यात आले आहे. |
| आ) | 9,975 अभिलेखांपैकी नष्ट करणे योग्य 2,453 अभलेख नष्ट करण्यात आले आहेत. |
| इ) | जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावत करण्यात आले आहे. |
| ई) | जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट लावण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. |
| उ) | वाहने सुस्थितीत असल्याने सध्या त्यांच्या निर्लेखनाची आवश्यकता नाही. |

# ४.तक्रार निवारण

| अ.क्र. | केलेली कार्यवाही |
| --- | --- |
| अ) | आपले सरकार पोर्टल वरील तक्रारींचे निराकरण-<br>दि.१६/०४/२०२५ पर्यंत 96 % तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून 4% तक्रारी प्रलंबित आहेत |
| आ) | पी.जी.पोर्टल वरील तक्रारींचे निराकरण-<br>दि.१६/०४/२०२५ पर्यंत 95 % तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून 5% तक्रारी प्रलंबित आहेत |
| इ) | प्रसिध्दी फलका द्वारे विविध योजनांची माहिती प्रदान करणारे दोन Digital Kiosk कार्यालयात बसवण्यात आलेले आहे. |
| ई) | निरंक |

# ५.कार्यालयीन सोई सुविधा

| अ.क्र. | केलेली कार्यवाही |
| --- | --- |
| अ) | कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे. |
| आ) | कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची सूविधा आहे. |
| इ) | महिला कर्मचारी व अभ्यागत यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा आहे. |
| ई) | अभ्यागतासाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था आहे. |
| उ) | कार्यालयामध्ये सुव्यवस्थित अधिकारी/कर्मचारी यांचे नामफलक व कार्यालयात शोभेची झाडे लावण्यात आली आहेत . |

# ६.कामकाजातील सुधारणा

| अ.क्र. | केलेली कार्यवाही |
| --- | --- |
| अ) | कार्यालयीन अधिकारी/कर्मचारी यांचे ई-ऑफिस प्रणाली वापरण्याचे प्रमाण - 100% |
| आ) | १) जल जीवन मिशन च्या सूधारीत प्रशासकीय मान्यता (अतांत्रिक) प्रस्तावासाठी ३ स्थर निश्चित करण्यात आले आहेत.<br>२) जल जीवन मिशन च्या सुधारीत प्रशासकीय मान्यता (तांत्रिक) प्रस्तावासाठी ३ स्थर निश्चित करण्यात आले आहेत. |
| इ) | ई-ऑफिसद्वारे निकाली काढलेल्या नस्त्यांची टक्केवारी - 81.05% |
| ई) | प्राप्त बातमी बाबतचा खुलासा वेळोवेळी करण्यात येतो. |

# ७.अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवाविषयक बाबी आणि कृत्रिम बुध्दिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर

| अ.क्र. | केलेली कार्यवाही |
|---|---|
| अ) | १) जल जीवन मिशनच्या पाणी गुणवत्ता व स्वच्छता या करीता अधिकारी कर्मचारी यांना प्रशाक्षित करून WASH EXPERT तयार करण्यासाठी MITRA या संस्थां ला प्रशिक्षण संस्था म्हणून घोषित करण्यात आले. विभागातील एकूण 682 अधिकारी कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले.<br>२) अन्य संस्थे कडून 365 अधिकारी कर्मचाऱ्याना प्रशिक्षण देण्यात आले. आशा एकूण 1,047 अधिकरी कर्मचारी प्रशिक्षित करण्यात आले.<br>३) MITRA,नाशिक या संस्थेमध्ये विभागातील 21 अधिकारी,कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. उर्वरीत अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण प्रस्तावित आहे. WASH कार्यक्रम अंतर्गत प्रशिक्षण देण्यास MITRA यांना घोषित करण्यात आले आहे. |
| आ) | विभागातील 39 अधिकारी व 69 कर्मचारी यांचे गोपनिय अहवाल प्राप्त करून घेण्यात आले. |
| इ) | भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा कार्यालयातील गट “अ”(10 संवर्ग), गट “ब”(8 संवर्ग),सहाय्यक भूवैज्ञानिक व शाखा अभियंता संवर्ग वगळता तसेच गट “क”(13 संवर्ग), यांच्या दिनांक ०१/०१/२०२५ अखेरच्या सेवा जेष्ठता याद्या अंतिमरित्या प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. |

# ८. आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन

| अ. क्र. | केलेली कार्यवाही |
|---|---|
| अ) | माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाडा वॉटर ग्रीड बाबत आंतरराष्ट्रीय वित्तिय संस्थाच्या प्रतिनिधी बरोबर ०७/०२/२०२५ रोजी बैठक घेण्यात आली. |
| आ) | जल जीवन मिशन अंतर्गत व अन्य योजनांन मधील कंत्राटदार उद्भवणाऱ्या बाबी , प्रधान सचिव (पा. पु. स्व. वि.) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन सोडवल्या जातात. |
| ई) | चाकण MIDC, व इतर विभाग यांचेबरोबर वेळोवेळी बैठक आयोजित करण्यात करुन त्यांचे कडील अडचणी  सोडवण्यात येतात. |

# ९. नाविन्यपूर्ण उपक्रम १– सुकर जीवनमान (१/३)

## अ ) नागरिक केंद्रित सेवांचे सुलभीकरण

### “महाजल समाधान”

- “महाजल समाधान” ही JJM करिता तक्रार निवारण प्रणाली विकासीत करण्यात आली आहे .
- “महाजल समाधान” ही ऑनलाइन सार्वजनिक तक्रार निवारण प्रणाली असून गावातील पाणी पुरवठ्याच्या समस्यांबाबत वेब पोर्टल अथवा ऍपच्या माध्यमातुन नागरिक तक्रार नोंदवु शकतात.
- नागरिकांच्या सुलभतेकरीता तक्रारींची वर्गवारी करण्यात आली आहे. त्यातील उचित पर्याय जसे की, पाणी गुणवत्ताविषयक समस्या, पाणी पुरवठा उपांगांची दुरुस्ती विषयक समस्या, पाणी गळती व पाण्याच्या चोरी विषयक समस्या, पाणी शुल्काविषयी समस्या इत्यादी पर्याय नागरिकांना देण्यात आले आहे.
- तक्रार नोंदविण्यासोबतच नागरिक आपल्या तक्रारीची सद्यस्थिती वेळोवेळी वेब पोर्टल अथवा ऍपद्वारे जाणुन घेऊ शकतात.
- संकेतस्थळ: महाजल समाधान

# ९. नाविन्यपूर्ण उपक्रम १- सुकर जीवनमान (२/३)

## अ ) नागरिक केंद्रित सेवांचे सुलभीकरण

**S A F A I (mobile Application)**

**<u>S</u>**anitation **<u>F</u>**unctionality **<u>A</u>**ssessment **<u>I</u>**ndicator

- स्वच्छ भारत मिशन -२ अंतर्गत विकसित उपांगांच्या कार्यरत असण्याचे (Functionality Assessment) माहिती घेण्याकरिता ॲप तयार करण्यात आले आहे.
- मोबाईल App मध्ये समाविष्ट केलेले मोड्युल्स खालील प्रमाणे :

अ) कुटुंब स्तरावरील स्वच्छतेची माहिती घेण्यासाठी समाविष्ट मोड्यूल

ब ) गाव स्तरावरील पडताळणी मध्ये सामाविष्ट मोड्यूल्स

क) ग्राम पंचायत स्तरावरील पडताळणीमध्ये सामाविष्ट मोड्यूल्स

संकेतस्थळ: **S A F A I (mobile Application)**

# ९. नाविन्यपूर्ण उपक्रम १- सुकर जीवनमान (३/३)

## अ ) नागरिक केंद्रित सेवांचे सुलभीकरण

नाविन्यपुर्ण उपक्रम :

### पाणी पुरवठा योजनांच्या परिचालन व देखभाल दुरुस्तीचे मुल्यांकन व मानांकन प्रणाली :

- पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या संचालन व देखभाल दुरुस्तीचे मुल्यांकन करण्यासाठी व त्याआधारे ग्रामपंचायतींना मुल्यांकन देण्यासाठी वॉटरशेड ऑर्गनायजेशन ट्रस्ट (WOTR) या संस्थेच्या सहकार्याने 102 गावाकरीता प्रायोगिक तत्वावर कार्यप्रणाली विकसित करण्यात आली. त्या गावातील पाणी पुरवठा योजनेच्या संचालन व देखभाल दुरुस्तीच्या संदर्भात प्लॅटीनम (90 %पेक्षा जास्त गुण), सुवर्ण (70-90 % ), रजत (50 ते 70 %), कांस्य (30 ते 50 %), अपात्र ( 30 % पेक्षा कमी) अशी मानांकन श्रेणी देता येऊ शकेल.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सक्रीय सहभागातुन पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्ती या विषयातील कामगिरी उंचावणे, उत्तम गुणांकन मिळवण्याकरीता ग्रामपंचायतींमध्ये गावागावांमध्ये स्पर्धात्मक वातावरण वाढविण्यासाठी प्रोत्साहन देणे, विविध शासकीय योजना, अशासकीय संस्था तसेच जलक्षेत्रातील देणगीदार व गुंतवणूकदारांना गावातील जलस्रोतांच्या विकास व व्यवस्थापनासाठी निधी मिळविण्यासाठी सदर गुणांकनाचा वापर करणे इत्यादी महत्वापुर्ण गोष्टी यातुन साध्य होण्यास मदत होईल.
- याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

# १०. नाविन्यपूर्ण उपक्रम २- कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा (१/३)

**Litigation Management System (LMS)**

- योजनांच्या तसेच आस्थापना विषयक बाबीच्या अनुषंगाने विविध न्यायालयीन प्रकरणे उद्भवत असतात. विभागातील अधिकारी/कर्मचारी याच्याकडे असलेल्या नियमित कामकाजा व्यतिरिक्त उद्भवत असलेल्या न्यायालयीन प्रकरणांमुळे कामकाजात अधिकाधिक भार येतो.
- यामुळे न्यायालयीन प्रकरणात कामकाजाच्या व्यस्ततेमुळे अनावधनाने दुर्लक्ष होऊन विपरीत परिस्थिती (अवमान याचिका इ.) निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर बाब लक्षात घेऊन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील न्यायालयीन प्रकरणे प्रभावीपणे व जलदरीत्या हाताळणे शक्य व्हावे यासाठी या वेब आधारित प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.
- विभागातील विविध न्यायालयातील दावे यांची सद्यस्थिती प्राप्त करुन घेण्यासाठी LMS विकसित केली आहे.
- सदर प्रणाली अंतर्गत न्यायालयातील कामकाजाचे वरीष्ठ स्तरावरुन पर्यवेक्षण करता येते.
- संकेतस्थळ: **Litigation Management System**

# १०. नाविन्यपूर्ण उपक्रम २- कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा (२/३)

## जल जीवन मिशन - जि. प. प्रकल्प संनियंत्रण प्रणालीचे (ZPPMS) डॅशबोर्ड

- जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत, जिल्हा परिषदेद्वारे राबविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांच्या कामांच्या देखरेखी करिता जि. प. प्रकल्प संनियंत्रण प्रणाली (ZPPMS ) विकसित करण्यात आली आहे.
- सदर प्रणाली मध्ये पाणी पुरवठा योजनेच्या भौतिक व आर्थिक सद्यस्थितीची माहिती अद्ययावत करण्यात येते.
- सदर प्रणाली द्वारे जि. प. , प्रकल्प व्यवस्थापन समिती व त्रयस्थ प्रकल्प यंत्रणा यांच्या द्वारे योजने संदर्भात करण्यात आलेल्या कामांचा नियमित आढावा घेण्यास व सद्यस्थिती अवगत करण्यास सहाय्य होते.
- Welcome to VProjects या संकेत स्थळावर सदर प्रणाली जिल्हा परिषद , प्रकल्प व्यवस्थापन समिती व त्रयस्थ प्रकल्प यंत्रणा यांच्या अधिकाऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# १०. नाविन्यपूर्ण उपक्रम २- कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा (३/३)

## जल जीवन मिशन - मा.जी.प्रा. प्रकल्प संनियंत्रण प्रणालीचे (DPMS)

- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत एकूण 929 पाणीपुरवठा योजना सध्या प्रगतीपथावर आहेत. या योजनांचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी -DPMS (Digital Project Monitoring System) ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे.
- DPMS प्रणालीमध्ये Geo-tagging चा वापर करून योजनेतील विविध घटक- जसे की पाण्याच्या टाक्या, जलशुद्धीकरण केंद्रे, पाईपलाईन इत्यादी - नकाशावर निश्चित केले जातात. त्यामुळे या सर्व घटकांचे स्थान (Location), क्षमतेसंबंधी माहिती (Capacity), तसेच पाईपलाईनचा प्रकार यासारखी उपयुक्त माहिती एका क्लिकवर उपलब्ध होते.
- 929 पैकी 915 योजनांमध्ये प्रत्यक्ष प्रगतीचे निरीक्षण मोबाइल ॲपद्वारे सुरू असून, DPMS च्या ॲपद्वारे संबंधित साइटवर होणाऱ्या कामाची माहिती तात्काळ प्रणालीमध्ये नोंदवली जाते.
- याशिवाय, GIS (Geographic Information System) आधारित प्रणालीद्वारे कामाची कालानुसार प्रगती (Time-based Progress) दर्शविली जाते, ज्यामुळे योजनांच्या अंमलबजावणीचा वेग व टप्पे सहज समजून घेता येतात.
- संकेतस्थळ: DPMS Portal

# धन्यवाद